☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 392 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 /                दिनांक : 13 / 10 / 2025

# "नांदेड पोलीस अधिकारी अंमलदार यांचे करीता "शारीरीक आरोग्य तपासणी" शिबीराचे आयोजन..

पोलीस विभागातील अधिकारी व अंमलदार हे 24 तास सतत कठीण परिस्थीतीत त्यांचे कार्य करत असतात त्यामुळे ते त्यांचे स्वास्थाकडे लक्ष देवू शकत नसल्याने नांदेड पोलीस विभागातील अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी शारिरिक आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्याचे **मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक नांदेड यांचे विचार होते.

त्या अनुषंगाने आज **दिनांक 13.10.2025 रोजी सकाळी 06.00 वा. ते 09.30 वा. दरम्यान स्नेह नगर पोलीस वसाहत येथील पोलीस रूग्णालय,नांदेड** येथे मोफत शारिरिक आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये 114 पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या शारिरिक आरोग्यांची तपासणी करण्यात आली आहे. तसेच **दिनांक 14,15 ऑक्टोबर रोजी सुध्दा सकाळी 06.00 वा. ते 09.30 वा. दरम्यान स्नेह नगर पोलीस वसाहत येथील पोलीस रूग्णालय,नांदेड** येथे शारिरिक आरोग्य तपासणी करण्यात येणार आहेत त्यामध्ये खालील प्रमाणे तपासणी करण्यात येणार आहे.

1.मधुमेह
2.लिपीड प्रोफाईल
3.किडणी फंक्शन टेस्ट
4.लिव्हर फंक्शन टेस्ट
5.कंप्लीट ब्लड काउंट
6.ब्लड ग्रुप उच्च रक्तदाब
7.बॉडी मास इंन्डेक्स

तरी नांदेड जिल्हयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर शारिरिक आरोग्य तपासणी मध्ये जास्तीत जास्त प्रमाणात सहभाग घेवून आरोग्य तपासणी करून घ्यावी असे आवाहन **मा.श्री.अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड**, यांनी केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड